# सूत्रसंचालन –सुधीर गाडगीळ

सूत्रसंचालन ही एक कला आहे. वक्तृत्व, कथाकथन, अभिनय या साऱ्या गोष्टीसाठी आवश्यक असलेले गुण सूत्रसंचालकाकडे असावे लागतात; पण त्याचबरोबर त्याचपाशी शब्दसंपत्ती हवी, शब्दोच्चार स्पष्ट हवेत, प्रसन्न –खेळकर भाषाशैली हवी. व्यासंग व सातत्य हवं, हजरजबाबीपणा हवा, मार्मिक व खेळकर शैली हवी. कार्यक्रम तडीस नेणारा नेतृत्वगुण हवाच, पण त्याचबरोबर सगळा कार्यक्रम एका माळेत सुसुत्रापणे ओवण्याचं व तरीही स्वतःला काही अंतरावर ठेवण्याचं कौशल्यही हवं. समयसूचकता व प्रसंगावधान हवं. चांगल्या आवाजाची देणगी असेल तर उत्तमच.

भाषाप्रभुत्व हवं

दिसेल ते पुस्तक व भेटेल तो माणूस वाचण्याची सवय सुत्रासंचालाकान स्वतःला लावली पाहिजे.शब्दसंपत्ती वाढवण्यासाठी दक्ष असल पाहिजे. सूत्रसंचालक व्हायचं तर विविध विषयांच्या संदर्भाच भान मनाच्या कोपऱ्यात जमा व्हायला हवं. आपण माहितीन परिपूर्ण असलो की, एन वेळी शब्दांचे पूल बांधणं सोपं जातं. अर्थात त्यासाठी शब्दासाठी असावा लागेल; अन्यथा त्याच त्या गुळगुळीत कल्पना व गुळगुळीत शब्द सूत्रसंचालक वापरेल. मग त्याचा कोणताही प्रभाव पडणार नाही. साहजिकच कार्यक्रमाला रंगत येणार नाही.

## सततची सज्जता

सूत्रसंचालक बहुश्रुत असावा लागते. सभाधीटपणा तर त्याच्यापाशी असावाच लागेल, पण तो हजरजबाबीही हवा. त्याची समजशक्ती चांगली हवी आणि त्याच्यापाशी समयसूचकताही हवी.मुख्य म्हणजे त्याच्याकडे चालू घडामोडींचं अद्यायावत ज्ञान हवं. केवळ एखद्या कार्याक्रमासाठी आयत्या वेळी तयारी करून सूत्रसंचालक म्हणून उभं राहता येत नाही. त्यासाठी कायमस्वरूपी तयारी हवी. केवळ दहा ओळींची संहिता लिहून सूत्रसंचालन होत नाही. त्यासाठी भरपूर पूर्वतयारी करायला हवी.ही पूर्वतयारी सततच्या वाचनानं होते

## ताज्या घडामोडींची जाण

सूत्रसंचालकान वृतपत्र वाचून ताज्या घडामोडी जाणून घ्यायला हव्यात. त्या दृष्टीनं जिज्ञासा हवी. त्याचा उपयोग होतोच. डोंबिवली इथं नाट्यसंमेलन होतं. शरद पवार व अमिताभ बच्चन यांच्या परिचयाची जबाबदारी अभिनय शेत्रातील दोन कलावंतांवर होती. त्यांनी सविस्तर ओळख करून दिली; पण त्यात वेळ जात असल्यानं श्रोत्यांमध्ये चुळबुळ सुरु झाली. अशा वेळी आर.आर.पाटील यांची ओळख करून देण्याची जबाबदारी माझ्यावर आली. प्रेक्षकांना कह्यात घायला हवं होतं; अन्यथा कार्यक्रमाचा बेरंग झाला असता.मला माझ्या दक्षतेचा फायदा झाला.त्या दिवशीच्या वृत्तपत्रांतून एक बातमी गाजली होती.सार्वजिन ठिकाणी तंबाखू खाण्यावरून आर.आर.पाटील यांना अजित पवार यांनी सुनावलं होत. ही बातमी वाचताना त्याचा कधी निवेदनात उपयोग होईल असं वाटलं नव्हतं; पण आता विंगेत आयत्या वेळी सुचल आणि मी म्हणालो,'त्यानंतर सन्माननीय उपमुख्यमंत्री आर.आर.पाटील आपलं मनोगत व्यक्त करतील. ...तोंडात तंबाखूची चिमुट न घेता. 'छोटासा पॉज घेत उच्चारलेल्या या वाक्यानं हशा मिळवला. वातावण जिवंत झालं.

## मुलाखत घेण्यापूर्वी

अलीकडे काही कार्यक्रमात सुत्रासंचालकालाच मुलाखती घेण्याचं कामही करावं लागतं. जाहीर व्याख्यानाऐवजी प्रश्नोत्तराच्या स्वरुपात सवांद साधायला काही जणांना आवडतं. तर काही वेळा कार्यक्रमाच्या संयोजकांचीच तशी इच्छा असते. सूत्रसंचालकाला आवश्यक सर्व गुण मुलाखत घेणाऱ्यालाही आवश्यक असतात.जाहीर कार्यक्रमात, रेडीओवर किंवा दूरचित्रवाणी वाहिन्यांसाठी मुलाखत घ्यावयाची असेल, तर सर्वात आधी महत्वाची गोष्ट म्हणजे ज्यांची मुलाखत घ्यावयाची त्याचा अभ्यास करायला हवा.समोरच्या व्यक्तींचा केवळ परिचय करून घायचा नाही, तर त्याच्याविषयी लोकांमध्ये जे कुतूहल आहे, त्याची पूर्ती करायची असते. त्या व्यक्तीच्या कार्याविषयी आदर असतोच, पण त्याचवेळी त्यांच्या क्षेत्राविषयी मनात जे अनेक प्रश्न येतात त्यांची उत्तरे मुलाखतीतून मिळाली तर ती लोकांना आवडतात.त्यामुळे लोकांच्या मनात काय प्रश्न असू शकतात, हे जाणून घेऊन प्रश्नावली तयार करायला हवी.

## मुलाखत घेताना

कार्यक्रमाला सुरुवात झाल्याबरोबर लगेच महत्वाचे प्रश्न विचारू नयेत. तर आधी त्या व्यक्तीच्या आवडत्या विषयावर गप्पा सुरु कराव्यात.अनौपचारिक वातावरण तयार करून त्या व्यक्तीला मोकळ करावं. त्या व्यक्तीचा विश्वास मिळवल्यावर आणि श्रोतेही खुलू लागल्यावर मुख्य विषयाच्या दिशेनं जावं छोटे व नेमके प्रश्न विचारावेत. समोरच्या व्यक्तीला मार्गदर्शन, उपदेश, सूचना करण्याच्या फंदात पडू नये. आपण त्या व्यक्तीला बोलते करण्यासाठी आलो आहोत या भूमिकेचा विसर पडू देता नये. त्या व्यक्तीचं कर्तुत्व नीट उलगडेल, त्याच्या कार्यक्षेत्रातील विविध प्रवाहांची, घडामोडींची माहिती मिळेल अशा रीतीचे प्रश्न तयार करावेत. जर अगोदरच प्रश्नावली दिली तर ती व्यक्तीही तयारी करून येऊ शकते. त्यामुळे मुलाखत रंगतानाच अधिक विश्वसनीय व अर्थपूर्ण होऊ शकते.

॥ धन्यवाद ॥